Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004,**
**MAHARASHTRA**
PHONE : EPABX - 2609000, www.unishivaji.ac.in,
**Other Exam- 2: PHONE :0231-2609120 oe2.exam@unishivaji.ac.in**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004,
महाराष्ट्र
दूरध्वनी–ईपीएबीएक्स-2609000, www.unishivaji.ac.in,
इतर परीक्षा 2:फोन नं. 0231-2609120 oe2.exam@unishivaji.ac.in

संदर्भ क्रं./शिवाजी वि/संपवमूमं कार्यालय/६४ दिनांक: ०४-०२-२०२३

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक/अधिविभागप्रमुख,
सर्व संलग्नित महाविद्यालये व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

विषय:-हिवाळी सत्र २०२२ च्या फेब्रुवारी २०२३ मध्ये होणाऱ्या परीक्षाबाबत....

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयसंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती यांनी दिनांक ०२-०२-२०२३ पासून आंदोलनाचा निर्णय घेतल्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२२ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व परीक्षांचे कामकाजावर बहिष्कार घालण्यात आलेला आहे.

शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित कोल्हापूर, सांगली, सातारा या तिन्ही जिल्ह्यातील महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक, अधिविभागप्रमुख, सर्व संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त शिक्षण संस्था, अधिविभाग यांना असे निदर्शनास आणुन देण्यात येते की, हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा विविध केंद्रावर सुरु आहेत. वरील संदर्भीय परिपत्रकानुसार दि.०२-०२-२०२३, दि.०३-०२-२०२३ व दि.०४-०२-२०२३ रोजीच्या परिक्षा स्थगित करण्यात आल्या होत्या. सदरच्या स्थगित केलेल्या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक स्वतंत्रपणे विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**तसेच दिनांक ०६-०२-२०२३ पासून निर्गमित केलेल्या परीक्षा पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार घेण्यात येणार असून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार विहित वेळेत परीक्षा पार पाडण्याची सर्वस्वी जबाबदारी ही परीक्षा केंद्रप्रमुख म्हणजेच अधिविभाग प्रमुख/संचालक/ महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक यांची आहे. त्या दृष्टीने परिक्षा केंद्रप्रमुख तथा प्राचार्यांनी आवश्यक ती उपाययोजना करुन परीक्षा विहित वेळेत पार पडतील याची दक्षता घेणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने पर्यायी उपाययोजना आखण्यात याव्यात.**

**तरी उपरोक्त परीक्षांबाबत विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरुन सत्वर अवगत करण्यात यावे.**

**कळावे,**

आपला विश्वासू,

**संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

Scanned with CamScanner

Estd.1962
A++ Accredited by NAAC(2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

## संदर्भ:- दि-०१-०२-२०२३ व दि. ०२-०२-२०२३ रोजीचे परिपत्रक

महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती यांनी दिनांक ०२-०२-२०२३ पासून आंदोलनाचा निर्णय घेतल्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२२ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व परीक्षांचे कामकाजावर बहिष्कार घालण्यात आलेला आहे.

शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित कोल्हापूर, सांगली, सातारा या तिन्ही जिल्ह्यातील महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक, अधिविभागप्रमुख, सर्व संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त शिक्षण संस्था, अधिविभाग यांना असे निदर्शनास आणुन देण्यात येते की, हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा विविध केंद्रावर सुरु आहेत. वरील संदर्भीय परिपत्रकानुसार दि.०२-०२-२०२३, दि.०३-०२-२०२३ व दि.०४-०२-२०२३ रोजीच्या परिक्षा स्थगित करण्यात आल्या होत्या. सदरच्या स्थगित केलेल्या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक स्वतंत्रपणे विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**तसेच दिनांक ०६-०२-२०२३ पासून निर्गमित केलेल्या परीक्षा पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार घेण्यात येणार असून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार विहित वेळेत परीक्षा पार पाडण्याची सर्वस्वी जबाबदारी ही परीक्षा केंद्रप्रमुख म्हणजेच अधिविभाग प्रमुख/संचालक/ महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक यांची आहे. त्या दृष्टीने परिक्षा केंद्रप्रमुख तथा प्राचार्यांनी आवश्यक ती उपाययोजना करुन परीक्षा विहित वेळेत पार पडतील याची दक्षता घेणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने पर्यायी उपाययोजना आखण्यात याव्यात.**

विद्यापीठ व महाविद्यालयीन सर्व कर्मचारी यांनी विद्यार्थी हित लक्षात घेवून दिनांक ०६-०२-२०२३ रोजी पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार सुरु होणाऱ्या परीक्षांच्या कामामध्ये सर्व घटकांनी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे. परीक्षेसाठी आवश्यक असणारी सर्व तयारी विद्यापीठाने केलेली आहे असे संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी सांगितले आहे.

तरी याबाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**स्थळ: कोल्हापूर**
**दिनांक: ०४-०२-२०२३**

Scanned with CamScanner